संक्षिप्त फौ. ख. क्र. २१८/२०२३
सरकार -वि.- संजय
नि.क्र. १३ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - रोहीत प्रकाश माथनीकर,
वय २५ वर्षे, व्यवसाय – मोबाईल शॉप,
राहणार – नागपूर, ता. जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. दिनांक १८.०३.२०२३ रोजी मी पोलीस स्टेशनला आलो होतो तेथून पोलिसांनी मला समन्स देऊन पांजरेपार गावाजवळील मुख्य रस्त्यावर नेले होते. तेथे पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला तसेच फोटो काढून माझी सही घेतली. आता मला दाखविलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१४** देण्यात येते. आता मला घटनास्थळाचे फोटो दाखविण्यात आले ते तेच आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येते.
सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. मी नागपूर येथे राहतो. पोलिसांनी मला पंचनाम्याला हजर राहणे कामी नागपूर येथे समन्स दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस स्टेशनला बसून सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, फोटो पोलीस स्टेशनला काढला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनामा वाचून पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला पंचनाम वाचून दाखविला

नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर गेलो नव्हतो व पोलिसांनी पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १९.०१.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.